**महाराष्ट्र विधानपरिषद**
**पत्रक भाग दोन**
**गुरुवार, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२०/ माघ २४, १९४१ (शके)**

**१२.** मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सुधारणा मांडण्याबाबत.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सर्व सदस्यांना निदेशानुसार कळविण्यात येते की, विधानमंडळाच्या उभय सभागृहांच्या सदस्यांपुढे गत सत्रात बुधवार, दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी झालेल्या मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर बुधवार, दिनांक २६ व गुरुवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी चर्चा होणार आहे. आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सदस्यांना सुधारणा मांडावयाच्या असल्यास त्या ३ प्रतींमध्ये सोमवार, दिनांक १७ फेब्रुवारी व मंगळवार, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई येथे देण्यात याव्यात.

निदेशानुसार असेही कळविण्यात येते की, म.वि.प. नियम ५९ मधील परंतुकानुसार कोणत्याही सदस्याला अशा सुधारणांच्या दहा पेक्षा जास्त सूचना देता येणार नाहीत.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १३ फेब्रुवारी, २०२०.

**राजेंद्र भागवत**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

**प्रती :**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
३. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
५. सचिव (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक.
६. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
७. प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

----------